# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

**प्रसिद्धी पत्रक** **दि. १८ ऑक्टोबर २०२०**

# सीमाताईंचे कार्य आभाळाहून मोठे : महापौर संदीप जोशी

## सन्मान स्त्री शक्तीचा : सीमा साखरे यांचा हृद्य सत्कार

**नागपूर, ता. १८ :** मथुरा येथील महिलेवरील अत्याचार असो की देशातील अन्य ठिकाणच्या घटना, जेथे-जेथे महिलांवर अत्याचार, तेथे-तेथे सीमाताई धावून गेल्या. अत्याचारपीडितेचे केवळ अश्रूच पुसले नाही तर त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष केला. आज ८७ वर्षांच्या वयातही त्यांची ऊर्जा कायम आहे. त्यांचे कर्तृत्व हे या शहरातीलच नव्हे तर देशातील प्रत्येक महिलेसाठी आदर्श आहे, या शब्दात महापौर संदीप जोशी यांनी प्रख्यात समाजसेविका सीमाताई साखरे यांच्या कार्याचा गौरव केला.

नवरात्र पर्वाचे औचित्य साधून महापौर संदीप जोशी यांनी शहरातील विविध क्षेत्रातील रणरागिणींचा गौरव करण्याचा संकल्प केला. या महिलांनी विपरीत परिस्थितीवर मात करून आपआपल्या क्षेत्रात कर्तृत्वाचा ठसा उमटविला. सीमाताई साखरे हे समाजकार्यातील आघाडीचे नाव. त्यांनी केलेला संघर्ष, स्त्री अत्याचाराविरुद्ध उठविलेला आवाज, उभारलेला लढा सारेच काही मोठे आहे. अत्याचाराला वाचा फोडून त्यांनी खऱ्या अर्थाने स्त्री शक्तीचा सन्मान केला. हा त्यांचा सत्कार म्हणजे प्रत्येक स्त्रीचा सन्मान, असे गौरवोद्‌गार महापौर संदीप जोशी यांनी काढले.

यावेळी महापौर संदीप जोशी यांनी मनपाचा दुपट्टा, साडी-चोळी, तुळशीचे रोपटे आणि मानपत्र देऊन सीमाताई साखरे यांचा त्यांच्या निवासस्थानी जाऊन सत्कार केला. यावेळी उपमहापौर मनीषा कोठे उपस्थित होत्या. सत्काराला उत्तर देताना सीमाताई साखरे म्हणाल्या, महापौर संदीप जोशी यांची ही संकल्पना स्त्री वर्गाचा सन्मान करणारी आहे. त्यांनी आमच्या निवासस्थानी येऊन आमच्या कार्याचा गौरव करणे, आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. या सत्काराने आम्ही कृतकृत्य झालो, या शब्दात त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

